# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे-०४

## * परिपत्रक *

**क्र.कोविमं/परिपत्रक/खा.वि. अतिविलंब शुल्क/ 2312 /दि.०६-०१-२०२२.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार मार्च-एप्रिल २०२२ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी)परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे अतिविलंब शुल्काने भरण्याबाबत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यासंबंधिच्या तारखा व करावयाच्या कार्यवाही संदर्भातील सूचना खालीलप्रमाणे :-

इ.१२ वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या मुदतवाढीबाबतच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र | कनिष्ठ महाविद्यालयांनी अतिविलंब शुल्क प्रती विद्यार्थी रुपये २०/- प्रतिदिन स्विकारुन विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा (इयत्ता १२वी) |
|---|---|
| १ | **बुधवार दिनांक:- ०५/०१/२०२२ ते बुधवार दिनांक:- १२/०१/२०२२.** |

इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांनी त्यांचे नाव नोंदणी अर्ज विहित शुल्क व मूळ कागदपत्रांसह कनिष्ठ महाविद्यालयामार्फत त्यावर SUPER LATE FORM शेरा लिहून ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर लगेचच दुस-या दिवशी विभागीय मंडळ कार्यालयात हस्तपोहोच जमा करावेत. तसेच यापूर्वी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरुनही हार्ड कॉपी / नोंदणी शुल्क जमा न केलेल्या विद्यार्थ्यांनी नव्याने ऑनलाईन अर्ज भरुन सर्व विहित प्रक्रीया करणे अनिवार्य राहिल.

दिनांक:- ०६/०१/२०२२

( श्री. एस.डी. सोनवणे )
विभागीय सचिव,
कोल्हापुर विभागीय मंडळ,कोल्हापूर.